# ये है 'बॉम्बे' मेरी जान!

गेल्या तीन दशकांत केवळ मुंबईच नव्हे, तर अवघं जग बदलून गेलं!

खरं तर दुसरं महायुद्ध संपलं आणि सहा दशकांपूर्वी टोपीकर इंग्रजांना भारताला स्वातंत्र्य देणं भाग पडलं, तेव्हाच जगाचा नकाशा एकदम बदलून गेला होता. भारताची फाळणी झाली होती आणि पाकिस्तानातून निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे भारतात येऊ लागले होते. मुंबई ही तेव्हा देशाची औद्योगिक राजधानी होती. साहजिकच भारतात येणाऱ्या लोंढ्यांचा एक मोठा प्रवाह मुंबईच्या दिशेनं आला. त्याच सुमारास केवळ रोजीरोटीच्या आशेपोटीच नव्हे तर आपल्या कर्तृत्वाला वाव याच मुंबईत मिळेल, या खात्रीपोटी लेखक असो की कवी; चित्रकार असो की शिल्पकार; सिनेमेवाले असोत की नाटकवाले; उद्योजक असोत की अर्थकारणी... विविध क्षेत्रांतील सर्जनशील माणसं मुंबईत येऊ लागली आणि या गावाचं बहुरंगी-बहुढंगी असं स्वरूप अधिकच बहरून येऊ लागलं. एकदा गप्पांच्या ओघात कोणी तरी बोलून गेलं होतं : 'मुंबई हे गाव असं की आहे की जिथं काहीही येत नसलेला माणूसही आपलं पोट सहज भरू शकतो आणि एखाद्याला आपल्या क्षेत्रातलं सर्वोच्च स्थान गाठायचं असलं, तर त्यालाही मुंबईतच यावं लागतं!' या उक्तीची प्रचिती जगभरातल्या आणखी अनेक शहरांना लागू पडणारी होती. त्यामुळेच जगभरातल्या अनेक शहरांबरोबरच स्वातंत्र्यानंतरच्या नव्या ऊर्मीनं जागृत झालेल्या भारतातील गावागावांचा मूळचा ढाचा बदलत चालला होता.

पण मुंबईचं गेल्या तीन दशकांतलं बदलणं, हे सर्वार्थानं विशेष होतं.

येणारा प्रत्येक नवा दिवस नवी आशा, नवी उमेद आणि त्याचबरोबर नवी दृष्टी घेऊन येतो. खरं तर प्रत्येक गाव दिवसागणिक बदलत असतं. नवे वारे गावाला नवं रूप देऊ पाहत असतात. दिवसागणिक माणसाचं वय वाढतं, तसंच गावाचंही. माणसाच्या गरजा दिवसागणिक वाढत जातात, तशाच गावाच्याही. दिवसागणिक येणारा नवा विचार, आचारात बदल घडवून आणत असतोच आणि हेच नवे आचार-विचार, गावालाही बदलायला लावतात. गेल्या काही दशकांत आणि विशेषत: १९७० चं ते अस्वस्थ दशक पार

केल्यानंतर, तर आचार-विचार आणि गरजाही आरपार बदलून गेल्या. १९८० आणि ९० या दोन दशकांत माहितीचं महाजाल आपल्यापुढे अवतरलं. माध्यमक्रांती झाली आणि जग बदलायला सुरुवात झाली. त्या वेळी मग मुंबईही आपलं रूपडं बदलू लागली, अगदी झपाट्यानं. इतर अनेक कोणतीही गावं आणि महानगरं यांच्यापेक्षा मुंबईच्या या बदलाचा वेग अधिक होता. शिवाय, तो दिवसागणिक अंगावर येऊ पाहणारा होता. १९९१ मध्ये भारतानं जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यांच्या स्वागतासाठी लाल गालिचे अंथरण्याचा निर्णय घेतला. 'ग्लोबलायझेशन'च्या स्वागताला जगातली सर्वात मोठी लोकशाही सज्ज झाली होती. बदलाचं हे वारं 'त्सुनामी'सारखा झंझावात घेऊन आलं होतं. आणि या साऱ्या वादळवाटांची साधी चाहूलही मनात नसताना, १९७० चं दशक संपता संपताच कायमच्या वास्तव्यासाठी मुंबईला येण्याचा निर्णय झाला होता.

मुंबईला अधूनमधून चार दिवसांसाठी येऊन, 'जिवाची मुंबई' करून नाशिकला परतणं आणि नाशिकहून बस्तान कायमचं मुंबईला हलवणं, यात फार मोठा फरक होता. पण सुदैवानं तो तेव्हा लक्षात आला नव्हता हे एका अर्थानं बरंच झालं, हे आता या गावात तीन दशकं घालवल्यानंतर सहजपणे सांगता येतं. अर्थात, तिशीच्या उंबरठ्यावर असताना तो फरक ध्यानीमनीही नव्हता आणि तो कोणी लक्षातही आणून दिला नव्हता. तसं होतं, तर कदाचित हा स्थलांतराचा निर्णय अमलातही आला नसता आणि आयुष्यातली ती महत्त्वाची तीस वर्षंही मग बहुधा गोदातीरीच व्यतीत झाली असती. आयुष्यातला एक फार मोठा धोका हा केवळ अज्ञानापोटी टळला होता. पण त्यामुळेच या झंझावाती बदलांचा एक साक्षीदार बनण्याची संधी मिळाली आणि अनुभवांच्या कक्षांबरोबरच साऱ्या जाणिवा जशा रुंदावत गेल्या, त्याचबरोबर खूप काही शिकायलाही मिळत गेलं. बघायला खूप मिळालं आणि तसंच ऐकायलाही. बघणं वार्ताहराच्या म्हणजेच बातमीदाराच्या नजरेतून होत होतं आणि त्यातूनच ही शिकवणी सुरू झाली होती! ऐकणं हे त्या पलीकडलं होतं. त्यात खरं काय आणि खोटं काय, हे उमजण्यासाठी बराच काळ जावा लागला. 'सीइंग इज बिलिव्हिंग, लिसनिंग इज नॉट' या उक्तीची प्रचितीही अनेकदा आली. पण त्यातूनच या अक्राळविक्राळ महानगराविषयी खूप काही समज आणि गैरसमजही मनात तयार होऊ लागले होते.

लहानपणापासूनच मुंबईचं आकर्षण होतं. काही कळायला लागायच्या आधीच एकुलता एक भाऊ शिक्षणाच्या निमित्तानं मुंबईत येऊन दाखल झाला होता. शिवाय, मावशीही मुंबईलाच राहायची आणि तीही खारसारख्या उच्चभ्रू वस्तीत. त्यामुळे मुंबईला येणं-जाणं व्हायचंच. त्या काळातल्या म्हणजे १९६० च्या दशकातल्या मुंबईच्या अनेक आठवणी आजही मनाच्या कोणत्या ना कोणत्या सांदीकपारीत दडून बसल्या आहेत. भाऊ पुढे कॉलेजचं वसतिगृह सोडून दादरच्या त्या प्रख्यात 'पालन शोजपाल' नावाच्या एका भल्यामोठ्या

आडदांड चाळीत राहणाऱ्या आतेभावाकडे 'पीजी' म्हणून राहायला लागला. कधी मुंबईला येणं झालं की अनेकदा तिथंच उतरायला व्हायचं. सी. के. बोले रोडवर अँण्टोनिया डिसिल्वा हायस्कूलच्या जराशी पुढे ही चाळ होती आणि तिच्या सर्वात वरच्या मजल्यावर दर्शनी कोपऱ्यात आतेभावाच्या तीन खोल्या होत्या. त्यातील एक खोली भावाची. ती कॉर्नरची असल्यानं तिथं वारं तुफान यायचं आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत तिथल्या प्रशस्त गॅलरीत झोपणं, हा एक अनुभव असायचा. खालच्या बोळकांडीत हिन्दी सिनेमांची भली मोठी लाइफ साइज पोस्टर्स हातानं रंगवण्याचं काम चालायचं. वरच्या पाचव्या मजल्यावरून ते बघत राहणं, हा एक मोठाच उद्योग असायचा. मावशीचं खारचं घर तेव्हा कौलारू होतं. पाठारे प्रभूंची तशी एकमजली वा दुमजली घरं खार पश्चिमेच्या त्या परिसरात होती. संध्याकाळी तिथं मस्त वारं सुटायचं आणि शिवाय एक भेळवालाही कोपऱ्यावर येऊन उभा राहायचा. 'बॉम्बे भेळ' म्हणजे काय ते तेव्हा कळलं आणि पुढे नाशकात गोदातीरी डिट्टो त्याच चवीची भेळ मिळायला लागली, तरी खारच्या त्या भेळवाल्यानं दिलेला झणझणीत ठसका आजही आठवतो आणि पाणी प्यायला लावतो.

वय वाढत गेलं. शाळा संपली. कॉलेजलाइफ सुरू झालं आणि हिन्दी सिनेमांचं गारूड मनावर ठाण मांडायला लागलं. तेव्हा मुंबईच्या फेऱ्या वाढत चालल्या होत्या. मग ग्रॅण्ट रोडच्या 'अप्सरा' टॉकीजमध्ये मावसबहिणीबरोबर राजेश खन्ना आणि शर्मिला टागोरचा 'सफर' सिनेमा बघायला गेलो आणि त्या टॉकीजचं ग्रँजर बघून थक्क व्हायला झालं. खरं तर त्यापूर्वीच भावानं 'मेट्रो'मध्ये काही इंग्रजी सिनेमे दाखवले होते आणि तेव्हा सुरुवातीला पडद्यावर येऊन डरकाळी फोडणारा 'मेट्रो गोल्डविन मेयर'चा सिंह बघून मनातल्या मनात घाबरायलाही झालं होतं. धोबी तलावावर आजही दिमाखात उभ्या असलेल्या त्या मेट्रो टॉकीजपुढे 'अप्सरा' म्हणजे झाड की पत्ती होतं. तरी आजही मनात तेच 'अप्सरा' टॉकीज दडून बसलेलं आहे. मग एकदा दिलीपकुमार-संजीवकुमार यांच्या अभिनयाची जुगलबंदी बघण्यासाठी भाऊ डोंगरीच्या 'डर्बी' टॉकीजमध्ये घेऊन गेला. सॅण्डहर्स्ट रोड स्टेशनवर उतरवून तो तिथं घेऊन जात असताना एक वेगळीच मुंबई बघायला मिळाली आणि या गावाविषयीच्या काही नेमक्या भावना मनात तयार होऊ लागल्या. कधीमधी काका वा वडील यांच्याबरोबर फोर्टच्या त्या उच्चभ्रू परिसरात फेरफटका मारणं व्हायचं. पुढे वडलांना एका वर्षी राज्य सरकारचा साहित्य पुरस्कार मिळाला, तेव्हा त्यांच्याबरोबर चक्क मरीन ड्राइव्हवरच्या एका सी-फेसिंग हॉटेलात एक रात्र मुक्काम करायची संधी मिळाली. खरी मुंबई तेव्हाच बघायला मिळाली. पण याच परिसरात पुढे आपलं सारं आयुष्य जाणार आहे, याची जराशीही कल्पना तेव्हा मनात आलेली नसायची. एकदा राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत नाशिकवाल्या आमच्या ग्रुपचं नाटक आलं, तेव्हा तर बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणून चक्क

रवींद्र नाट्यमंदिरात एक रात्रीचा मुक्काम झाला. तोपावेतो १९७० चं दशक उजाडलेलं होतं. तरीही एक गाव म्हणून या शहराचं असं काही स्पष्ट चित्र मनात उभं राहत नव्हतं. दिशा कळत नसत. 'ईस्ट आणि वेस्ट' ही या शहरातली भानगड ध्यानात येत नसे. साधं एकट्यानं मुंबईला आल्यास दादरला भावाकडे कसं जायचं, हा प्रश्नही अगदी सोप्या पद्धतीनं सोडवला होता. त्या काळात दादरला फुलबाजाराच्या कोपऱ्यावरच्या एका अगडबंब इमारतीवर तितकंच अगडबंब असं 'पनामा'चं ब्लेड जाहिरात म्हणून उभं करण्यात आलं होतं. दादरला उतरलं की नाशिककडे पाठ करून उभं राहायचं आणि ते ब्लेड ज्या दिशेला आहे त्या दिशेला बाहेर पडायचं, म्हणजे पालन शोजपाल चाळ येणार! इतक्या साध्या सोप्या पद्धतीनं तेव्हा मुंबई आत्मसात करण्याचा प्रयत्न केला होता, हे आजही आठवतं.

मुंबईत कायमच्या वास्तव्याला येण्यापूर्वी या महानगरातली बहुतेक महत्त्वाची ठिकाणं ही किमान बसमधून तरी पाहिलेलीच होती. 'बेस्ट'च्या ८१ क्रमांकाच्या मार्गावरून प्रवास करणं हा 'हाय ब्रो' मुंबईवर दूरवरून नव्हे तर जवळून दृष्टिक्षेप टाकण्याचा एक उत्तम मार्ग त्या काळात होता आणि आजही आहे. त्या मार्गानं अनेकदा प्रवास झालेला होता. शिवाय, डबल डेकर बसमधून, वरच्या मजल्यावर सर्वात पुढच्या सीटवर बसून प्रवास करणं म्हणजे तर साक्षात स्वर्गलोकी घेऊन जाणाऱ्या विमानातलाच प्रवास, हे शाळकरी वयातच मनावर पक्कं बिंबलेलं होतं. चर्चगेटला लोकलमध्ये बसलं की पुढे खार आणि बोरिवली येणार आणि कल्याणच्या मावसभावाच्या घरातून निघून लोकल पकडल्यावर येणारं शेवटचं ठिकाण 'व्हीटी' असणार, एवढं अगाध ज्ञान पाठीशी घेऊन बिऱ्हाडबाजलं मुंबईत आणलं. त्या दरम्यान, दादरच्या पालन शोजपाल चाळीत राहणाऱ्या भावानं बोरिवली पूर्वेला असलेल्या राजेंद्रनगर या हौसिंग बोर्डाच्या वसाहतीत जागा मिळवली होती. १९७९ च्या जानेवारीत 'महाराष्ट्र टाइम्स'मधील नोकरी पक्की झाली, तेव्हा मुंबईत आल्यावर बस्तान तिथंच बसवावं लागणार, हे उघड होतं.

'टाइम्स'ची ती सुविख्यात वास्तू ही बोरीबंदर रेल्वे स्थानकाच्या समोरच असल्यामुळे अनेक प्रश्न सुटलेले होते. इतक्या मोक्याच्या जागेवरची नोकरी मिळायला खरं तर नशीबच लागतं! अर्थात, तेव्हा 'मटा'मध्ये आपल्याला बातमीदारी करावी लागणार आहे आणि त्यामुळे 'टाइम्स'च्या वास्तूच्या बाहेरच सारा वेळ राहावं लागणार आहे, हे ध्यानीमनीही नव्हतं. पण अवघे १५ दिवस 'मटा'च्या डेस्कवर खर्डेघाशी केल्यानंतर एक दिवस फतवा निघाला आणि वार्ताहराचं काम देण्यात आलं. तिथं दिनू रणदिवे मुख्य वार्ताहर होते. त्यांच्याइतका सज्जन आणि मनाचा मायाळू गृहस्थ पुढच्या तीन दशकांत भेटला नाही, एवढं एकच वाक्य रणदिवे यांचं वर्णन करण्यास पुरेसं आहे. रणदिवे यांनी पहिल्याच दिवशी मला मंत्रालयात पाठवण्याचा निर्णय घेतला आणि अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या

भुवया उंचावल्या. मंत्रालय कव्हर करणं हा वार्ताहराच्या आयुष्यातला सर्वोच्च बहुमान समजला जाण्याचा तो काळ होता. अर्थात, रणदिवे यांनी मला मंत्रालय कव्हर करायला पाठवण्याचा निर्णय बिलकूलच घेतलेला नव्हता. तर त्या दिवशी मंत्रालयात असलेलं संध्याकाळचं एक भाषण —ज्याची बातमी आली काय अन न आली काय, काहीच फरक पडला नसता, ते कव्हर करायला पाठवायचं ठरवलं होतं. एका सहकाऱ्याला मी मंत्रालय कुठे आहे, असं विचारलं. खरं तर त्याचा अर्थ मंत्रालयात कसं जायचं, असा होता. पण 'मंत्रालयही ठाऊक नाही आणि मुंबईत रिपोर्टिंगला आलंय बेणं!' असा अर्थ लावून टवाळी सुरू झाली. हा मुंबईनं शिकवलेला पहिला धडा होता. हे गाव शिकून घेतल्याशिवाय इथं काम करता येणार नाही, हा धडा तातडीनं अमलात आणायचं ठरवलं. दुसऱ्याच दिवशी मुंबईचा रोड मॅप आणि बेस्ट बस मार्गांचं गाईड विकत घेतलं आणि रात्री घरी जेवायचं नाही, हाही निर्णय घेतला. त्यामुळे उशीर होतोय, घरी लवकर जायला हवं, ही मनावरची टांगती तलवार कायमची दूर झाली! दिवसाची मुंबई ही बातमीची जी काही असाइनमेंट असेल, त्यानुसार बघायला मिळत होतीच; रात्री लवकर घरी जायचं टेन्शन गेलं आणि रात्रीचीही मुंबई शिकण्याचा कार्यक्रम सुरू झाला. अर्थात, 'रात्रीची मुंबई' या शब्दप्रयोगानं जे काही मुंबईबाहेरच्या लोकांच्या डोक्यात येतं, ते मात्र आजतागायत शिकता आलं नाही, हा भाग निराळा.

पुढे वर्ष-दोन वर्षातच अधिकृतपणे मुंबई महापालिका हा 'बीट' मिळाला आणि एकदम 'तिळा, तिळा! दार उघड!!' अशीच अवस्था झाली. खऱ्या अर्थानं मुंबई शिकता आली, ती बोरीबंदरच्या महापालिका मुख्यालयाच्या त्या टोलेजंग वास्तूत पाच-सात वर्षं काढता आल्यामुळे. हे त्या वास्तूचं, तिथल्या बिलंदर लोकप्रतिनिधींचं, आपल्याच मस्तीत वागणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं ऋण मान्य करावंच लागेल.

कोणतंही शहर शिकायचं म्हणजे केवळ रस्ते आणि इमारतींची नावं माहिती करून घेणं बिलकूलच नसतं. त्या गावातल्या माणसांची नस ओळखता आली तरच ते गाव खऱ्या अर्थानं लक्षात आलं, असं म्हणावं लागतं. मुंबईतला बेरकी माणूस क्षणात भावविवशही होऊ शकतो आणि दुसऱ्याच क्षणी पुन्हा 'गुंतुनी गुंत्यात सारा, पाय माझा मोकळा!' या पद्धतीनं पुढे चालू कसा लागतो, ते मुंबई महापालिकेत ही पाच-सात वर्षं घालवल्यानंच शिकता आलं. प्रत्येक गावाचा एक धर्म असतो. म्हणजे अमृतसरचा शीख आणि काशी-प्रयागचा हिंदू या अर्थानं नव्हे, तर तो एक आगळावेगळा स्वभावधर्म असतो. नाशिकसारख्या सत्तरच्या दशकातल्या त्या छोटेखानी गावातनं आल्यामुळे तर या महानगराचा स्वभाव नेमका कसा आहे, ते कळायलाच बरेच दिवस लागले. 'मटा'सारखं अग्रगण्य वर्तमानपत्र, गोविंद तळवलकर यांच्यासारखा जीवनाच्या विविध क्षेत्रांतील घडामोडींमध्ये रस असलेला

संपादक आणि दिनू रणदिवे यांच्यासारखा समाजाच्या तळागाळातील लोकांच्या व्यथा-वेदना जाणून घेऊन, त्यांची तड लावण्यासाठी पत्रकारितेत आलेला मुख्य वार्ताहर, असा योग जुळून आला आणि महापालिका बीट करता करताच या गावातल्या अनेक घडामोडी अगदी जवळून बघण्याची संधी रोजच्या रोज उपलब्ध होत गेली. त्यातून या गावाचा धर्म हळूहळू लक्षात यायला लागला. हे शहर बहुरंगी, बहुढंगी आहे, हे शाळेतच इतिहासाच्या पुस्तकात शिकायला मिळालं होतं. या गावात नाना धर्मांचे, नाना जातींचे लोक गुण्यागोविंदानं नांदतात, हेही ठाऊक होतं. पण बातमीदारी करता करता लक्षात आलं की हाच या गावाचा धर्म आहे— कॉस्मोपॉलिटन!